13 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैद्यकीय शिक्षणातील संधीचा विस्तार गरजेचा

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ हॉटेल सयाजी येथे उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

रशिया आणि युक्रेन युद्धामुळे वैद्यकीय क्षेत्र पुन्हा चर्चेत आले आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी तिकडे जाण्याचा विद्यार्थ्यांचा कल आणि परत आल्याने मुलांचे भवितव्य पाहता, भविष्यात मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ हॉटेल सयाजीमध्ये पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी. लिट. तर ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांना डी. एस्सी. पदवीने सन्मानित केले. कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या अध्यक्षस्थानी होते. ३६१ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवीने सन्मानित केले. ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकाने गौरविले. डॉ. धनाजी मालवेकर यांना एक्सलन्स इन रिसर्च म्हणून सन्मानित केले. दीक्षांत मिरवणुकीत परीक्षा नियंत्रक डॉ. अजितसिंह पाटील यांनी ज्ञानदंड घेतला होता.

डॉ. शिर्के म्हणाले, युक्रेनमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी भारतात आले, त्यांच्या उर्वरित शिक्षणाचे काय?, वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांना युक्रेनला का जावे लागते. या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळण्याची गरज आहे. यासंदर्भात सरकारने विशेष धोरण तयार करावे. मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार करून शाश्वत उपाय काढता येऊ शकतो. कौशल्य वापरून समाजाचे आरोग्य सुदृढ बनविण्यात पुढाकार घ्या, परंतु नावापेक्षा उत्तम माणूस बना असे आवाहन त्यांनी केले.

कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल यांनी अहवाल वाचन केले. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, वित्त अधिकारी श्रीधर नारायण स्वामी, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. राकेश कुमार शर्मा, प्राचार्य डॉ. सुचीत्राराणी राठोड, डॉ. बी. साबळे, डॉ. अनिल कुमार गुप्ता, कुलगुरु डॉ. प्रभात रंजन, कुलगुरू डॉ. के. प्रथापन, मेघराज काकडे, अजितराव बेनाडीकर, श्रीलेखा साटम, डॉ. वैशाली गायकवाड, उपकुलसचिव संजय जाधव आदी उपस्थित होते.






कोल्हापूर : डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षांत समारंभात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी. लिट. तर ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांना डी. एस्सी. पदवी प्रदान करताना कुलपती डॉ. संजय डी. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत डॉ. शिंपा शर्मा, कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, करण काकडे आदी. दुसऱ्या छायाचित्रात पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर टोप्या आकाशात भिरकावून आनंद साजरा करताना विद्यार्थी-विद्यार्थीनी. (छाया : इम्रान गवंडी)

### ९ जणांना सुवर्ण पदक

गुरूपाल सिंग, मोनिका भोंडे, प्रीती काळे, प्रियांका निंबाळकर, सरहद पत्की, निवेदिता पाटील, प्रथमेश फडके, तेजल राव, अंकुर जैन यांना सुवर्ण पदकाने गौरविले.

### अत्याधुनिक सुविधा देणार

सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांसह पदवी पदविका विद्यार्थ्यांचे अभिनंदन. या विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे कार्य करावे, आधुनिक ज्ञान आत्मसात करावे. वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश क्षमता वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात २३ मजली इमारत बांधून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सोयी सुविधा देण्यात येणार आहेत.

– कुलपती डॉ. संजय डी. पाटील

### राजाराम महाराजांचे स्वप्न पूर्ण

सर्वसामान्यांना शिक्षण मिळण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्य मी जवळून अनुभवले. संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि ताराराणी पराक्रमी असूनही त्यांची म्हणावी तितकी दखल न घेतल्याने मी त्यांच्यावर अभ्यास केला. शाहू महाराजांच्या प्रयत्नांमुळे कृष्णाबाई केळवलकर ही पहिली महिला वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात गेल्या. त्यांची मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली. महाराजांच्या स्नुषा इंदुमती राणी यांना दिल्लीत वैद्यकीय शिक्षणासाठी पाठवले. राजाराम महाराज यांच्या स्वप्नातील एक शिवाजी विद्यापीठ, दुसरे मेडिकल कॉलेज काढणे, ही दोन्ही स्वप्न डी. वाय पाटील यांनी पूर्ण केली.

– ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार

### वनस्पतीमुळेच मिळाली ओळख

शाहू नगरी जागतिक पातळीवरील मेडिकल हब म्हणून पुढे येण्यास डी. वाय. पाटील विद्यापीठाचे योगदान महत्वाचे आहे. कोल्हापुरात सर्व प्रकारची फुले, वनस्पती आढळतात. वनस्पतींनीच मला ओळख दिली. वनस्पतींविना मानवी जीवन व प्रगती अशक्य आहे. विद्यापीठ वनस्पती संवर्धन मोहीम राबवतेय, त्याला इतरांनी ही हातभार लावावा.

– डॉ. एस. आर. यादव

13 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैद्यकीय क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार हवा

## कुलगुरू डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ थाटात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रशिया-युक्रेन युद्धासारख्या जागतिक घडामोडीमुळे वैद्यकीय क्षेत्र पुन्हा चर्चेत आले आहे. तिकडे जाण्याचा कल आणि परत येणाऱ्या मुलांचे भवितव्य पाहता, भविष्यात वैद्यकीय व पॅरामेडिकल क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार होण्याची आवश्यकता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांनी शनिवारी येथे व्यक्त केली.

डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ शनिवारी हॉटेल सयाजी येथे झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे ते म्हणून बोलत होते.

कुलपती डॉ.संजय डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, कुलगुरू डॉ.राकेश कुमार मुदगल, प्र-कुलगुरू डॉ.शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ.विश्वनाथ भोसले, परीक्षा नियंत्रक डॉ.अजितसिंह पाटील, वित्त अधिकारी श्रीधर नारायण स्वामी प्रमुख उपस्थित होते. या समारंभात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांना डी.लिट. तर वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा.डॉ.एस.आर. यादव यांना डी.एस्सी. पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी ३६१ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवीने तर ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले. डॉ.धनाजी मालवेकर यांचा एक्सलन्स इन रिसर्च म्हणून सन्मान झाला.





कोल्हापुरात शनिवारी हॉटेल सयाजी येथे डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दहावा दीक्षांत सोहळा थाटात पार पडला. यावेळी कुलपती डॉ. संजय डी. पाटील व प्रमुख अतिथी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट. आणि वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांना डीएस्सी पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी शिंपा शर्मा, राकेशकुमार मुदगल, आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, करण काकडे आदी उपस्थित होते. (छाया: नसीर अत्तार)

### सतत शिकत राहा : डॉ. मुदगल

डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राकेश कुमार मुदगल यांनी वेगवान जगात टिकायचे, तर सतत शिकत राहा, नवे ज्ञान-कौशल्ये आत्मसात करा, असे आवाहन केले.

### ०९ जणांना सुवर्ण पदक

गुरुपाल सिंग (एमबीबीएस), मोनिका भोंडे (बी.एस्सी नर्सिंग), प्रीती काळे (पी.बी. नर्सिंग), प्रियांका निंबाळकर(एम.डी.), सरहद पत्की(एम.एस.), निवेदिता पाटील(एम.डी-सब्जेक्ट), प्रथमेश फडके व तेजल राव, अंकुर जैन या ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकाने गौरविण्यात आले, तर डॉ. धनाजी मालवेकर यांचा एक्सलन्स इन रिसर्च अवॉर्डने सन्मान करण्यात आला.

### डी. वाय. पाटील यांनी शाहूंचा वारसा पुढे नेला

डी.लिट स्वीकारल्यानंतर डॉ.जयसिंगराव पवार यांनी शाहू महाराज यांनी कोल्हापुरात वैद्यकीय शिक्षणासाठी घेतलेल्या पुढाकाराचा इतिहास सांगताना, कृष्णाबाई केळवकर यांना परदेशात वैद्यकीय शिक्षणासाठी मदत केली, शिकून आल्यानंतर मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून त्यांची कोल्हापुरात नियुक्तीही केली. आपली विधवा सून इंदुमतीराणी यांनाही दिल्लीला वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले. शाहू महाराजांच्या नंतर राजाराम महाराजांनीही हेच धोरण पुढे चालू ठेवले. शिवाजी विद्यापीठाचे स्वप्न साकारले आणि मेडिकल कॉलेजचे स्वप्न डी.वाय.पाटील यांनी पूर्ण करून, शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे नेला.

### उत्तम माणूस बना

वैद्यकशास्त्राचा अभ्यास कठीण असला, तरी येथे मिळणारा मान आणि सन्मान अतुलनीय आहे. एक चांगला डॉक्टर, स्वत:पेक्षाही इतरांचा जीव वाचविण्यास प्राधान्य देतो. नाव, कीर्ती व संपत्ती मिळविण्यापेक्षा उत्तम माणूस बनण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन शिर्के यांनी केले.

### कोरोना काळातील काम कौतुकास्पद

कोरोना काळात डी.वाय. पाटील ग्रुपने सामाजिक भावनेतून केलेल्या कामाचा मी साक्षीदार आहे. रुग्ण आणि कर्मचाऱ्यानाही त्यांनी कुटुंबाप्रमाणे जपले हे अत्यंत अभिमानास्पद व कौतुकास्पद असल्याचे डॉ.शिर्के यांनी सांगितले.

### उत्तम आरोग्यसेवा द्या

अध्यक्षीय भाषणात कुलपती डॉ.संजय डी.पाटील यांनी पदवीधारकांचे अभिनंदन करताना, अत्याधुनिक ज्ञान आत्मसात करून उत्तम आरोग्यसेवा करावी, असे आवाहन केले. वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेशक्षमता वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असेही सांगितले.

13 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैद्यकीय शिक्षणातील संधींचा विस्तार गरजेचा

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के, डी. वाय. पाटील विद्यापीठाचा १० वा दीक्षांत समारंभ उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिक्रिया**

रशिया आणि युक्रेन युद्धासारख्या घडणाऱ्या जागतिक घडामोडीमुळे वैद्यकीय क्षेत्र पुन्हा चर्चेत आले आहे. तिकडे जाण्याचा असलेला कल आणि परत येणाऱ्या मुलांचे भवितव्य पाहता भविष्यात मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार होण्याची आवश्यकता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मांडली. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ शनिवारी हॉटेल सयाजी येथील व्हिक्टोरिया सभागृहात झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल, प्र-कुलगुरू डॉ. शिम्पा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, परीक्षा नियंत्रक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त अधिकारी श्रीधर नारायण स्वामी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट., तर ख्यातनाम वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना डी.एस्सी. पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी ३६१ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवीने सन्मानित करण्यात आले. ९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने गौरवण्यात आले, तर डॉ. धनाजी मालवेकर यांना एक्सलन्स इन रिसर्च म्हणून सन्मानित करण्यात आले.

कुलगुरू शिर्के म्हणाले, कोरोना काळात डॉ. संजय डी. पाटील आणि सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली डी. वाय. पाटील ग्रुपने सामाजिक भावनेतून केलेल्या कामाचा मी साक्षीदार आहे. रुग्ण त्याचबरोबर आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांनी कुटुंबाप्रमाणे जपले हे कौतुकास्पद आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. संजय डी. पाटील यांनी सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांसह पदवी, पदविका विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे कार्य करावे, आधुनिक ज्ञान आत्मसात करावे. वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. येत्या काळात विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सोयी-सुविधा देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढवा मांडला. सत्काराला उत्तर देताना डॉ. श्रीरंग यादव म्हणाले, शाहू नागरी जागतिक पातळीवरील मेडिकल हब म्हणून पुढे येण्यास डी. वाय. पाटील विद्यापीठाचे योगदान महत्त्वाचे आहे.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, बहुजन समाजाला शिक्षण मिळावे यासाठी शाहू महाराज यांनी मोठे कार्य केले. त्यांच्यामुळेच कृष्णाबाई केळवकर ही पहिली महिला कोल्हापुरातून वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात गेली. इंदूमती राणी या विधवा सुनेलाही शाहू महाराज यांनी दिल्ली येथे वैद्यकीय शिक्षणासाठी पाठवले. राजाराम महाराज यांची दोन स्वप्ने, त्यातील एक शिवाजी विद्यापीठ स्थापना आणि दुसरे होते ते मेडिकल कॉलेज काढण्याचे आणि हे दुसरे स्वप्न डी. वाय. पाटील यांनी पूर्ण केले.

यावेळी रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. राकेश कुमार शर्मा, नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य डॉ. सुचित्राराणी राठोड, माजी कुलगुरू ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. साबळे, ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डीचे कुलगुरू डॉ. प्रभात रंजन, डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रथापन, मेघराज काकडे, अजितराव बेनाडीकर, सीएचआरओ श्रीलेखा साटम, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड यांच्यासह ग्रुपच्या विविध संस्थांचे प्राचार्य, विभागप्रमुख व विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या १० व्या दीक्षांत समारंभामध्ये डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लीट, तर डॉ. एस. आर. यादव यांना डी.एस्सी पदवी प्रदान करताना कुलपती डॉ. संजय डी. पाटील, शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राकेश कुमार मुदगल, डॉ. शिम्पा शर्मा, आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, करण काकडे.

### ३६१ विद्यार्थ्यांना पदवी

दीक्षांत समारंभामध्ये १४ जणांना पीएच.डी, २० जणांना एमडी, १३ एम.एस. मेडिकल फिजिक्स, ६ एम.एस. मेडिकल बायोटेक्नॉलॉजी, ५ एम.एस. स्टेम सेल अँड रिजनरेटिव्ह मेडिसिन, २० एमएस नर्सिंग, १५८ एमबीबीएस, ४७ बी.एस्सी नर्सिंग, २५ पोस्ट बेसिक नर्सिंग, २१ डीएमएलटी आणि २३ ओटी टेक्निशियन पदवी व पदविका यावेळी प्रदान करण्यात आल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2022
पुढारी




कोल्हापूर : डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट., वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना डी.एस्सी. पदवीने गौरविताना कुलपती डॉ. संजय डी. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

# वैद्यकीय शिक्षणातील संधींचा विस्तार होण्याची आवश्यकता

## कुलगुरू शिर्के ; डी. वाय. पाटील विद्यापीठाचा १० वा दीक्षान्त समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रशिया आणि युक्रेन युद्धासारख्या घडणाऱ्या जागतिक घडामोडीमुळे वैद्यकीय क्षेत्र पुन्हा चर्चेत आले आहे. तिकडे जाण्याचा कल व परत येणाऱ्या मुलांचे भवितव्य पाहता भविष्यात मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रांतील शैक्षणिक संधींचा विस्तार होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या १० व्या दीक्षान्त समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलपती डॉ. संजय डी. पाटील अध्यक्षस्थानी होते. समारंभात बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य आ. ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल, प्र- कुलगुरू डॉ. शिल्पा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, परीक्षा नियंत्रक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त अधिकारी श्रीधर नारायण स्वामी उपस्थित होते.

याप्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट. व वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना डी.एस्सी. पदवीने गौरविण्यात आले. ३६१ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवीने सन्मानित करण्यात आले. ९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देण्यात आले. डॉ. धनाजी मालवेकर यांना एक्सलन्स इन रिसर्च म्हणून सन्मानित करण्यात आले.

कुलपती डॉ. संजय डी. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे कार्य करावे. वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

डॉ. यादव व डॉ. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. राकेश कुमार शर्मा, प्राचार्य डॉ. सुचित्राराणी राठोड, माजी कुलगुरू डॉ.पी. बी. साबळे, डॉ. अनिल कुमार गुप्ता, कुलगुरू डॉ. प्रभात रंजन, कुलगुरू डॉ. के. प्रथापन, मेघराज काकडे, अजितराव बेनाडीकर, श्रीलेखा साटम, डॉ. वैशाली गायकवाड उपस्थित होते.

13 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नाव कमवा; मात्र मूल्यांची जोपासना करा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दीक्षान्त सोहळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : विद्यार्थ्यांनो यशाचा जादुमय फॉर्म्युला नाही. आयुष्यात नोकरी किंवा उद्योग करा. स्वतःची प्रतिमा तयार करा. नाव कमवताना मात्र मानवी मूल्यांची जोपासना करत राहा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. भविष्यात मेडिकल व पॅरामेडिकल क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विस्तार होण्याची आवश्यकता आहे, असेही ते म्हणाले.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षान्त सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट., तर वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना डी.एस्सी. पदवीने सन्मानित केले. डॉ. धनाजी मालवेकर यांचा 'एक्सलन्स इन रिसर्च' म्हणून सन्मान झाला. कुलपती डॉ. संजय डी. पाटील अध्यक्षस्थानी होते. हॉटेल सयाजी येथील व्हिक्टोरिया सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाचे या विद्यापीठाशी सौहार्दतेचे संबंध आहेत. जागतिक घडामोडींचा विचार करता रशिया आणि युक्रेन युद्धामुळे वैद्यकीय क्षेत्र पुन्हा चर्चेत आले आहे. तिकडे जाण्याचा असलेला कल आणि परत येणाऱ्या मुलांचे भवितव्य पाहता मेडिकल क्षेत्रातील शैक्षणिक संधींचा विचार होण्याची आ वश्यकता आहे."

डॉ. पवार म्हणाले, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सुरू केलेल्या चळवळीचे मी उत्पादन आहे. माझे गुरू कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्यामुळे संशोधनाकडे वळलो. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणींच्या लढ्याचा इतिहास दुर्लक्षित राहिल्याने मराठा इतिहासाच्या संशोधनाचे कार्य हाती घेतले. शाहूंचे विचार जगभरात पोचविण्यासाठी पाच खंड लिहिले. शाहूपुत्र छत्रपती राजाराम महाराजांची विद्यापीठ व मेडिकल कॉलेजच्या स्थापनेचे स्वप्न होते. पैकी माजी राज्यपाल डी. वाय. पाटील यांच्या माध्यमातून मेडिकल कॉलेजच्या स्थापनेचे स्वप्न पूर्ण झाले."

डॉ. यादव म्हणाले, "छत्रपती शाहू नगरी हब ऑफ एज्युकेशन बनली आहे. डी. वाय. पाटील एज्युकेशन इन्स्टिट्यूट 'वर्ल्ड क्लास डायनॅमिक इन्स्टिट्यूट' झाली आहे."

कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी मनोगत व्यक्त केले. प्र- कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, परीक्षा नियंत्रक डॉ. अजितसिंह पाटील, वित्त अधिकारी श्रीधर नारायण स्वामी, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. राकेश कुमार शर्मा, प्राचार्य डॉ. सुचित्राराणी राठोड, कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता, डी. वाय पाटील इंटरननशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डीचे कुलगुरू डॉ. प्रभात रंजन, डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रथापन, श्रीलेखा साटम उपस्थित होते.



कोल्हापूर : डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी अभिमत विद्यापीठाच्या शनिवारी झालेल्या दहाव्या दीक्षान्त सोहळ्यात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना डी.लिट व डॉ. श्रीरंग यादव यांना डी.एस्सी पदवी देऊन सन्मानित करताना कुलपती डॉ. संजय पाटील व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आमदार ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, करण काकडे, राकेशकुमार मुदगल डॉ. शिंपा शर्मा.

### पदवी, पदविका प्रदान

सोहळ्यात १४ जणांना पीएच.डी, २० जणांना एमडी, १३ एम.एस. मेडिकल फिजिक्स, ६ एम.एस. मेडिकल बायोटेक्नॉलॉजी, ५ एम.एस. स्टेम सेल अंड रीजनरेटिव्ह मेडिसिन, २० एमएस नर्सिंग, १५८ एमबीबीएस, ४७ बी.एस्सी नर्सिंग, २५ पोस्ट बेसिक नर्सिंग, २१ डीएमएलटी आणि २३ ओटी टेक्निशियन पदवी व पदविका प्रदान केल्या.

### ९ जणांना सुवर्ण

गुरूपाल सिंग (एमबीबीएस), मोनिका भोंडे (बी.एस्सी नर्सिंग), प्रीती काळे (पी.बी. नर्सिंग), प्रियांका निंबाळकर (एम.डी.), सरहद पत्की (एम.एस.), निवेदिता पाटील (एम.डी-सब्जेक्ट), प्रथमेश फडके व तेजल राव, अंकुर जैन या ९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने गौरवले. डॉ. धनाजी मालवेकर यांचा एक्सलन्स इन रिसर्च ॲवॉर्डने सन्मान केला. ३६१ विद्यार्थ्यांना सन्मानित केले.

13 MAR 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा पुष्पविज्ञान संचालनालयाबरोबर सामंजस्य करार

## पुष्पविज्ञान विषयक संशोधन व विकासाला चालना मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पुणे येथील आयसीएआरचे पुष्पविज्ञान संशोधन संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान अधिविभाग यांच्यादरम्यान गुरुवारी शैक्षणिक व संशोधकीय आदानप्रदानविषयक सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे पुष्पविज्ञानविषयक संशोधन व विकासाला चालना तर मिळेलच, शिवाय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये करिअर संधी म्हणूनही या शिक्षणाचा प्रसार करता येईल. विद्यापीठातील विज्ञान शाखेत सुरू असलेल्या संशोधक क्षेत्रालाही याचा लाभ होणार आहे.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व प्रकुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आणि डॉ. प्रसाद यांनी स्वाक्षरी केली.



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठ व पुणे येथील आयसीएआरचे पुष्पविज्ञान संशोधन संचालनालय यांच्यात शैक्षणिक संशोधन आदानप्रदान सामंजस्य करार झाला.

करारानंतर भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) पुष्पविज्ञान संशोधन संचालनालयाचे (डीएफआर) संचालक डॉ. के.व्ही. प्रसाद यांनी विद्यापीठाकडून आणखी मदतीची अपेक्षा व्यक्त केली. ते म्हणाले, भारतीय पुष्पविज्ञान संचालनालयाच्या माध्यमातून पुष्पज्ञानविषयक संशोधन, तंत्रज्ञान, जनजागृती व प्रसार या अनुषंगाने व्यापक कार्य करण्यात येत आहे. शिवाजी विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य करारामुळे पुष्पविज्ञानविषयक संशोधन व विकासाला चालना तर मिळेलच, शिवाय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये करिअर संधी म्हणूनही या शिक्षणाचा प्रसार करता येईल.

यावेळी जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमास प्रा. व्ही.ए. बापट, वरिष्ठ संशोधक डॉ. प्रशांत कवर, डॉ. सुषमा पाटील आणि महेश कांबळे आदींची उपस्थिती होती.

13 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुष्पविज्ञान संशोधनात विद्यापीठ भरीव योगदान देईल

## डॉ. के. व्ही. प्रसाद : शिवाजी विद्यापीठाचा पुष्पविज्ञान संचालनालयासमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये वनस्पतीशास्त्रासह विविध शाखांमध्ये महत्त्वाचे संशोधन कार्य सुरू आहे. पुष्पविज्ञानाच्या संशोधन क्षेत्रातही विद्यापीठ भरीव योगदान देईल, अशी अपेक्षा भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या पुष्पविज्ञान संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी व्यक्त केली.



**कोल्हापूर : सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

पुणे येथील आयसीएआरचे पुष्पविज्ञान संशोधन संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा जैव तंत्रज्ञान अधिविभाग यांच्यादरम्यान शैक्षणिक व संशोधकीय आदान-प्रदानविषयक सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पुष्पविज्ञानातील शैक्षणिक व संशोधन संधींकडे अद्याप म्हणावे तितके गांभीर्याने पाहिले जात नाही. तथापि, संशोधनापासून ते स्वतंत्र व्यवसाय संधींपर्यंत अनेक शक्यता यात अंतर्भूत आहेत. त्यादृष्टीने काही विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम हाती घेता येतील का, यादृष्टीनेही विद्यापीठ शक्यतांची पडताळणी करून पाहील.

सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि डॉ. प्रसाद यांनी स्वाक्षरी केल्या. कार्यक्रमास प्रा. व्ही. ए. बापट, वरिष्ठ संशोधक डॉ. प्रशांत कवर, डॉ. सुषमा पाटील आणि महेश कांबळे आदी उपस्थित होते.

13 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुष्पविज्ञानात विद्यापीठ योगदान देईल

## डॉ. के. व्ही. प्रसाद : आयसीएआर-शिवाजी विद्यापीठात सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठ पुष्पविज्ञानाच्या संशोधन क्षेत्रात भरीव योगदान देईल, अशी अपेक्षा भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) पुष्पविज्ञान संशोधन संचालनालयाचे (डीएफआर) संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी नुकतेच येथे केले. पुणे येथील आयसीएआरचे पुष्पविज्ञान संशोधन संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा जैवतंत्रज्ञान अधिविभाग यांच्यात शैक्षणिक व संशोधकीय आदानप्रदानविषयक सामंजस्य करार करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करार झाला.

डॉ. प्रसाद म्हणाले, ''भारतीय पुष्पविज्ञान संचालनालयाच्या माध्यमातून पुष्विज्ञानविषयक संशोधन, तंत्रज्ञान, जनजागृती व प्रसार या अनुषंगाने व्यापक कार्य करण्यात येत आहे. विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य करारामुळे पुष्पविज्ञानविषयक संशोधन व विकासाला चालना तर मिळेलच, शिवाय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये करिअर संधी म्हणूनही या शिक्षणाचा प्रसार करता येईल.''



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि आयसीएआर-डीआरएफ यांच्यादरम्यान झालेल्या सामंजस्य करार प्रसंगी कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद. शेजारी डॉ. व्ही. ए. बापट, डॉ. प्रशांत कवर, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ज्योती जाधव व डॉ. सुषमा पाटील.

डॉ. शिर्के म्हणाले, ''पुष्पविज्ञानातील शैक्षणिक व संशोधन संधींकडे अद्याप म्हणावे तितके गांभीयनि पाहिले जात नाही. तथापि, संशोधनापासून ते स्वतंत्र व्यवसाय संधींपर्यंत अनेक शक्यता यात अंतर्भूत आहेत. त्या दृष्टीने या संदर्भातील काही विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम हाती घेता येतील का, या दृष्टीनेही विद्यापीठ शक्यतांची पडताळणी करून पाहील.''

सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. प्रसाद यांनी स्वाक्षरी केल्या. प्रा. व्ही.ए. बापट, वरिष्ठ संशोधक डॉ. प्रशांत कवर, डॉ. सुषमा पाटील, महेश कांबळे उपस्थित होते. जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांनी प्रास्ताविक केले.

13 MAR 2022


पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. गुरव यांना साहित्य अकादमी पुरस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माझ्या मनात लिहिणं हे सतत रुंजी घालत असतं. त्या अर्थानं मी सातत्यानं 'मनात' लिहिणारा माणूस ठरतो. वाचक म्हणून आपण जे पेरून घेतो, तेच कालांतरानं उगवून येतं; अशी माझी लेखनामागची धारणा आहे, असे प्रतिपादन कोल्हापूरचे साहित्यिक तथा शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव यांनी नवी दिल्ली येथे केले.



दिल्ली : डॉ. किरण गुरव यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करताना साहित्य अकादमीचे चेअरमन डॉ. चंद्रशेखर कंबार.

नवी दिल्ली येथील कमलानी सभागृहात डॉ. गुरव यांना शुक्रवारी सायंकाळी साहित्य अकादमीचे चेअरमन डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे व साहित्य अकादमीचे व्हाईस चेअरमन माधव कौशिक उपस्थित होते. दरम्यान, साहित्य अकादमीने 'आजादी का अमृतमहोत्सव' अंतर्गत १० ते १५ मार्च या कालावधीत 'साहित्योत्सव' आयोजित केला असून, याअंतर्गत विविध उपक्रम आयोजित केले आहेत.

13 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचक म्हणून आधी पेरून घेतो, कालांतराने उगवून येते

## डॉ. किरण गुरव यांनी उलगडला लेखन प्रवास : साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लिहिणं हे माझ्या मनात सतत रुंजी घालत असतं. त्या अर्थानं मी सातत्यानं 'मनात' लिहिणारा माणूस ठरतो. वाचक म्हणून आपण जे पेरून घेतो, तेच कालांतरानं उगवून येतं, अशा शब्दांत कोल्हापूरचे साहित्यिक तथा शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव यांनी साहित्य अकादमी पुरस्कार स्वीकारल्यानंतर लेखन प्रवास उलगडला.

डॉ. गुरव यांना 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या कथासंग्रहाला यंदा मानाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. नवी दिल्ली येथील कमलानी सभागृहात शुक्रवारी साहित्य अकादमीचे चेअरमन डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे व साहित्य अकादमीचे व्हाइस चेअरमन माधव कौशिक उपस्थित होते.

डॉ. गुरव म्हणाले, कथेचा आवाका माळरानातून वाहणाऱ्या एका ओढ्यासारखा असतो. त्या ओढ्याची म्हणून एक जैविक परिसंस्था असते. अगदीच समुद्राप्रमाणे महाकाय नसली तरी तिच्या दृष्टीने परिपूर्ण आणि जिवंत असते. निसर्गात म्हणून तिचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान असते. तेच स्थान साहित्यविश्वात कथेचे आहे.



कोल्हापूरचे साहित्यिक किरण गुरव यांना शुक्रवारी नवी दिल्ली येथील कमलानी सभागृहात साहित्य अकादमीचे चेअरमन डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### साहित्योत्सवात गुरव करणार मराठीचे प्रतिनिधित्व

- साहित्य अकादमीने 'आज़ादी का अमृत महोत्सवां'तर्गत १० ते १५ मार्च या कालावधीत 'साहित्योत्सव' आयोजित केला आहे. याअंतर्गत साहित्यविषयक विविध उपक्रम आयोजित केले आहेत.
- यातील देशभरातील साहित्य अकादमी विजेत्या २४ विविध भाषिक साहित्यिकांचा 'लेखक-संवाद' हा उपक्रमही समाविष्ट आहे. यातही डॉ. किरण गुरव मराठी साहित्याचे प्रतिनिधी म्हणून सहभागी होत

लोकमत

# भोसले यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख तथा ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ.अरुण भोसले यांच्या 'दक्षिण महाराष्ट्र: राजकीय चळवळी व नेतृत्व' या पुस्तकाचे आज रविवारी शाहू स्मारक भवनमध्ये सायंकाळी ५.३० वाजता प्रकाशन होणार आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांच्या हस्ते होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के आहेत. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.अवनीश पाटील आणि डॉ.भारतभूषण माळी यांनी केले आहे.

पुढारी

# डॉ. अरुण भोसले यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख तथा ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. अरुण भोसले यांच्या 'दक्षिण महाराष्ट्र : राजकीय चळवळी व नेतृत्व' या पुस्तकाचे रविवारी सायंकाळी साडेपाच वाजता प्रकाशन करण्यात येणार आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते प्रकाशन होईल. शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभाग व शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू स्मारक भवन येथे हा समारंभ होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अवनीश पाटील, डॉ. भारतभूषण माळी यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाला १० कोटी



अनेकवेळा घोषणा होऊनही शिवाजी विद्यापीठातील काही अध्यासनांची निर्मिती आणि आधुनिकीकरण होत नव्हते . या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये मात्र त्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय अधिवेशनात घेण्यात आला आहे . यामध्ये प्रामुख्याने शाहू महाराज संशोधन केंद्र तसेच संग्रहालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशाला आदींच्या आधुनिकीकरणाला प्राधान्य दिले जाणार आहे .

13 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात चित्रपटनिर्मिती अभ्यासक्रम : गायकवाड

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठात जूनपासून चित्रपटनिर्मिती प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. त्यात विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानही मिळणार आहे, अशी माहिती विद्यापीठ अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड आणि सांगलीतील कलातरंग सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक विशाल कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोल्हापूर चित्रपटगृहाचे माहेरघर असल्याने विद्यापीठात चित्रपटनिर्मितीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणारा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू होण्याची गरज होती. त्याबाबत वारंवार विद्यापीठ प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अधिसभेमध्ये ठराव मांडला होता. त्याला यश मिळाले आहे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक, शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञान मिळणार आहे. पुढील काळात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू होतील. विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामध्ये सुरू होणाऱ्या या अभ्यासक्रमात दिग्दर्शन, संहिता लेखन, रेकॉर्डिंग, व्हिडिओ एडिटिंग आदींचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. चित्रपट, नाट्यक्षेत्रातील तज्ज्ञ, कलाकार मार्गदर्शन करणार आहेत. अभ्यासक्रमाबाबतचे नियोजन या विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सकाळ

# डॉ. अरुण भोसले यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांच्या 'दक्षिण महाराष्ट्र : राजकीय चळवळी व नेतृत्व' पुस्तकाचे उद्या(ता. १३) सायंकाळी ५.३० वाजता प्रकाशन करण्यात येणार आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते प्रकाशन होईल. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. इतिहासप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अवनीश पाटील व डॉ. भारतभूषण माळी यांनी केले आहे.